# Bharatiya Janata Party
# भारतीय जनता पार्टी

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point,
Mumbai 400 020 ● Tel: 22022050 ● E-mail: bjpmanogat@gmail.com .

प्रसिद्धीसाठी जुलै २, २००९

## बोगस/बांगलादेशी मतदारांना ओळखपत्रे देण्याचा घोटाळा

**-डॉ. किरीट सोमैय्या**

ही धक्कादायक बाब आहे कि मुंबईतील निवडणूक अधिकारी हजारो बोगस/बांगलादेशी मतदारांना बोगस ओळखपत्रे देण्यावर ठाम आहेत. विविध तहसीलदार, मतदार नोंदणी अधिकारी, जिल्हाधिकारी यांना नुकत्याच देण्यात आलेल्या सूचनांमध्ये मतदार ओळखपत्रांसाठी अर्ज करणाऱ्या मतदारांकडून कोणत्याही समर्थक कागदपत्राची मगणी न करण्ाची सक्त सूचना देण्यात आली आहे.

निवडणूक विभागाने प्रपत्र क्र. ८ वितरित केले आहे जे दुरुस्ती करण्यासाठी आणि मतदार ओळखपत्र मिळविण्यासाठी आहे. या प्रपत्रात, निवडणूक विभागाने **''कोणतेही समर्थक कागदपत्र जोडायचे नाहीत''** अशी स्वतंत्र सूचना ठळक अक्षरात छापली आहे.

हे दुसरे तिसरे काही नसून, बोगस/बांगलादेशी मतदारांना ओळखपत्रे प्राप्त करण्यासाठी मदत व्हावी म्हणूनच आहे. यामुळे बोगस नोंदणी आणि बोगस मतदार ओळखपत्रे यांना प्रोत्साहन मिळेल. त्याचा परिणाम नकली नोंदणी आणि नकली ओळखपत्रे यातही होईल.

या ठिकाणी नोंद घेणे आवश्क आहे कि मतदार ओळखपत्रे देण्याच्या कामाची स्थिती चिंताजनक आहे. एकूण मतदारांपैकी केवळ २८% मतदारांना ओळखपत्रे देण्यात आली आहेत, जे प्रमाण गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामीलनाडूमध्ये ९५ ते ९८ % आहे.

भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या उल्लंघनाचा तीव्रपणे निषेध केला आहे. डॉ. सोमैय्या यांनी असे म्हटले आहे कि यामुळे बोगस नोंदणी आणि नकली मतदार ओळखपत्रांना प्रोत्साहन मिळेल. हा आगामी विधानसभा निवडणूकांसाठी आखण्यात आलेला घोटाळा आहे, आणखी काही नाही.

*प्रसिद्धी सचिव*